# लोक महाविद्यालय, वर्धा

## गृहअर्थशास्त्र विभाग अहवाल 2018-19

लोक महाविद्यालयातील सत्र-2018-19 या शैक्षणिक सत्रात बी.ए. भाग 1 , 2 व 3 गृहअर्थशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. विद्यार्थिनीच्या व्यक्तिमत्व विकास तसेच व्यावहारिक व दैनंदिन जीवनासाठी गृहअर्थशास्त्र विषयाचे ज्ञान विद्यार्थिनींना मिळावे या दृष्टीने हा विभाग कार्यरत असतो. या विभागाअंतर्गत विद्यार्थिनी एक सुगृहिणी काशी बनेल तसेच स्वयंरोजगार करून आपले अर्थार्जन कशाप्रकारे करू शकतात याविषयी अनेक उपक्रम घेऊन त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. दि. 6.9.2018 गृहअर्थशास्त्र विभागाच्या वतीने B.A. भाग 2, सत्र 3 च्या विद्यार्थिणींसाठी 'बेकरी प्रॉडक्ट डेमोन्स्ट्रेशन' चे आयोजन करण्यात आले यात केक कसा तयार करावा याविषयी सौ. प्रीती सूर्यवंशी यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले या कार्यक्रमाला प्रा. सोनाली बन्सोड प्रा. निलीमा डहाके तसेच विभागाच्या विद्यार्थिनी आदि उपस्थित होत्या.

दि. 12.10.2018 ला "Flower Arrangement and Making Mobile Cover" याविषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यात विद्यार्थिनींना पुष्परचनेचे प्रकार , विविध आकार , पुष्परचनेचे नियम त्यासाठी आवश्यक साहित्य या संबंधी मार्गदर्शन करण्यात आले त्याचप्रमाणे शिवणकाम करून म्हणजेच वेगवेगळ्या आकाराची mobile cover शिवून कसे तयार करावे या विषयी प्रा. सौ निलीमा डहाके यांनी B.A. भाग 1 सत्र 2 च्या विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेला विभागप्रमुख प्रा. सोनाली बन्सोड, प्रा. डॉ. सरीता गणराज, प्रा. डॉ. सुचित्रा पाटणे या उपस्थित होत्या.

दि.16.10.2018 ला 'World Food Day' निमित्याने 'आरोग्याविषयि जागरूकता' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानाच्या प्रमुख वक्त्या प्रा. कल्पना ढोले , रा.सू. बिडकर महाविद्यालय , हिंगणघाट यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी विद्यार्थिनींना आरोग्याविषयि जागरूक कसे रहावे या संबंधी मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे या दिवसाच्या निमित्याने पौष्टिक अन्नपदार्थ पाककला स्पर्धेचे आयोजन देखील करण्यात आले होते. या स्पर्धेचे मुल्यांकन प्रा. कल्पना ढोले यांनीच केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सौ. पुष्पा तायडे , प्रा. सोनाली बन्सोड, प्रा. सरीता गणराज आदि उपस्थित होत्या तसेच विभागाच्या सर्व विद्यार्थिनींनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून चांगला प्रतिसाद दिला.

या विभागाअंतर्गत दि. 2. 1 .2019 ला विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये रांगोळी, पाककला, पुष्परचना ई. स्पर्धा घेण्यात आल्या. या सर्व स्पर्धांना गृहअर्थशास्त्र विषयाच्या सर्व विध्यार्थिनींनी भरभरून प्रतिसाद दिला. महाविद्यालयाच्या प्राचार्या. डॉ.सौ. पुष्पाताई तायडे , उपप्राचार्य प्रा. श्री. पाटणे महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व सर्व विध्यार्थांनी भेटी दिल्या.

दि. 8.3.2019 ला गृहअर्थशास्त्र विभाग, महिला कक्ष व दक्ष नागरिक फाऊंडेशन वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने "जागतिक महिला दिन" कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाला डॉ. उषाताई काळे प्रमुख पाहुण्या होत्या. तसेच प्रकाशजी खंडार अध्यक्ष नागरिक फाऊंडेशन वर्धा , विद्या कळसाईत उपाध्यक्ष इम्रान राही, PSI मा. गावंडे, यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याच प्रमाणे विद्यार्थिनींना रिना कावळे (पोलिस) यांनी कराटे प्रशिक्षण दिले.

दि. 9.3.2019 ला उद्योजक केंद्र प्रदर्शनी भेट ' या अंतर्गत गृहअर्थशास्त्र विभागाच्या वतीने स्थानिक " Bombatkar Food" या लघुउद्योगास भेट देण्यात आली या भेटी अंतर्गत प्राकृतिक तेल घाणीतून शुद्ध स्वरुपात सोयाबीन , शेंगदाने व मोहरी तेल कश्याप्रकारे काढले जाते. तसेच अश्याप्रकारचे लघुउद्योग सुरू करण्यासाठी काय करावे ? त्यासाठी लागणारा कच्चा माल , यंत्र सामुग्री, कर्ज सुविधा , तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया केले जाणारे परिश्रम म्हणजे स्वयंरोजगाराची संपूर्ण मार्गदर्शक तत्वे या संबंधी विद्यार्थिनींना श्री. अमित बोंबटकर संचालक , यांनी मार्गदर्शन केले . या भेटीमध्ये गृहअर्थशास्त्र विभागाच्या 34 विद्यार्थिनी तसेच गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. सोनाली बन्सोड, प्रा. डॉ. सरीता गणराज , प्रा. निलीमा डहाके यांचा सहभाग होता. या भेटीच्या यशस्वीतेकरीता महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सौ. तायडे, तसेच सर्व प्राध्यापक वृंदाचे सहकार्य लाभले.

**प्रा.सौ.सोनाली रा. बन्सोड**
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख
लोक महाविद्यालयं, वर्धा